महाराष्ट्र शासन

क्रमांक:-जिपअ-२०१७/प्र.क्र.४९/आस्था-४
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
मुंबई-४००००१.
दिनांक:- २६.०९.२०१७

संदर्भ:-

१) **शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२, दि.२५.०५.२००६**
२) **शासन आदेश क्रमांक. झेडएनजी-२०१२/प्र.क्र.७०/आस्था-४, दि. १०.१०.२०१२.**
३) **शासन परिपत्रक क्र. विसुची-२४१७/प्र.क्र.११६/आस्था-१, दि.२०.०७.२०१७.**

कार्यालयीन आदेश

संदर्भ क्र. १ येथील शासन अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ दि. ०१ जुलै, २००६ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(१) व (२) अंतर्गत प्रत्येक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी त्यांना दुय्यम अधिकाऱ्यास अंतिम निर्णय घेण्यासाठी शक्ती प्रदान करावयाच्या आहेत. तसेच विभागाशी/कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करण्याचे निदेश दि.०५.०३.२००७ च्या कार्यालयीन आदेशान्वये देण्यात आले आहेत.

२. अधिनियमातील कलम ९ (३) नुसार निश्चित केलेले स्तर पुढील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी अद्ययावत करावयाचे आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकान्वये नव्याने निश्चित बाबी संदर्भात या कार्यासनातील विषयावर निर्णय घेण्याचे प्रस्तुत स्तर सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्याचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे त्यामध्ये योग्य तो बदल करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१६१९३०२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2017.09.26 16:40:33 +05'30'

(वि.र.शिंदे)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) यांचे स्वीय सहायक, फोर्ट, मुंबई-१
२. कक्ष अधिकारी, आस्था-१
३. कक्ष अधिकारी, समन्वय कक्ष
४. निवड नस्ती (आस्था-४)

कार्यालयीन आदेश क्र. जिपअ:-२०१७/प्र.क.४९/आस्था-४

अ.क्र	विषय	प्रथम	व्दितीय	तृतीय	आदेश/प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
१.	जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ संवर्गातील बांधकाम (अर्हताप्राप्त व अर्हतारहित दोन्ही), सिंचन (अर्हताप्राप्त व अर्हतारहित दोन्ही), पशुसंवर्धन, कृषी, लेखा, विद्युत व यांत्रिकी, पाणी पुरवठा मधील कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सूची, तसेच त्यांना मानीव दिनांक देणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी
२.	जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांच्या (मुख्य कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्र विकास सेवा मधील अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागातील अधिकारी वगळून) तक्रारी व विभागीय चौकशीची प्रकरणे संबंधित प्रशासकीय विभागांना पाठविणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	-	उप सचिव / कक्ष अधिकारी
३.	जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांच्या (महाराष्ट्र विकास सेवा व सिंचन विभागातील अधिकारी वगळून) सेवा निवृत्तीनंतर विलंबाने अदा केलेल्या देय रकमांवर व्याजाबाबतची प्रकरणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकीय कारणास्तव मुख्यालय सोडण्यासाठी परवानगी देणे, विमान प्रवासासाठी परवानगी देणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी
५.	मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे विभागीय आयुक्तांकडून प्रतिवेदित करून प्राप्त झालेले गोपनीय अहवाल विभागीय सचिवांकडून पुनर्विलोकित करून घेऊन ते संस्करणसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	-	उप सचिव / कक्ष अधिकारी
६.	जिल्हा परिषदेचे वर्ग-१ व वर्ग-२ चे अधिकारी (महाराष्ट्र विकास सेवा मधील व सिंचन विभागातील अधिकारी वगळून) यांचे वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलाचे प्रस्ताव, अतिरिक्त कार्यभाराचे प्रस्ताव.	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी
७.	सर्व विधानमंडळ समित्या (लोकलेखा समिती व पंचायत राज समिती वगळून) राज्यस्तरावरील सांविधानिक व असांविधानिक समित्या व आयोग विकास यांच्या जिल्हास्तरावरील उपसमित्या, उप	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी

	आयोग यांच्या अशासकीय सदस्यांना बैठकभत्ता व वाहनखर्चाची प्रतिपूर्ती.				
८.	उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या आस्थापना विषयक बाबी हाताळणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी
९.	उपरोक्त सर्व विषया संदर्भात निर्णय घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन कार्यवाही करणे.	कक्ष अधिकारी	उप सचिव	-	कक्ष अधिकारी
१०	वरील सर्व विषयास अनुसरुन घेतलेल्या निर्णयासंबंधित उद्भवणारी सर्व लोकायुक्त व न्यायालयीन प्रकरणे	कक्ष अधिकारी	उप सचिव	सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)	उप सचिव / कक्ष अधिकारी

****